# श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात.

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

**क्र.आरटीएस/अपिल/९५/२०२४**

**दिनांक-०७.०३.२०२५**

**प्रति,**

**१. श्रीमंत विठोबा कलगोंड**
**रा.लकडेवाडी, ता.जत, जि.सांगली ... अपिलार्थी**

**विरूध्द**

**१. भगवान कोंडिबा कलगोंड**
**२. सुखदेव ईश्वर कलगोंड**
**३. आनंदाबाई बाबासो कलगोंड**
**४. गुलाब विठोबा कलगोंड**
**५. संभाजी पांडूरंग कलगोंड**
**६. शिवाजी पांडूरंग कलगोंड**
**सर्व रा.लकडेवाडी, ता.जत जि.सांगली ... जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

| गांव | तालुका | गट नंबर | एकूण क्षेत्र | पैकी वादाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| लकडेवाडी | जत | २५/२ | १.६८ हे.आर<br>पो.ख.०.०० हे.आर | १.६८ हे.आर |

मौजे लकडेवाडी ता.जत येथील गट नंबर २५/२ संदर्भात तहसिलदार, जत यांनी क्र.आरटीएस/एसआर/५३/२०१७, दिनांक २७.०२.२०१७, अन्वये दिले वाटप आदेशावर अपिलार्थी यांनी तत्कालीन उपविभागीय अधिकारी जत यांचेकडे क्र.आरटीएस/अपील/२५/२०१९ चे अपिल दाखल केलेले होते. सदर अपिलाचा निर्णय दिनांक ०९.०३.२०२१ रोजी झालेला असून सदर निर्णयावर व्यथित होऊन अपिलार्थी मा.अपर जिल्हाधिकारी सो, सांगली यांचेकडे क्र.आरटीएस/दुसरे अपिल/२२३/२०२१,दाखल केले होते. सदर अपिलाचा निर्णय दिनांक २२.०२.२०२४ रोजी झालेला असून तत्कालीन उपविभागीय अधिकारी जत यांचेकडील उक्त आदेश रद्द करून प्रकरण निकालपत्रात नमूद कारणास्तव फेरचौकशी करून निर्णय करणेचे आदेशित केलेले आहे.

**प्रस्तुत अपिलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी प्रस्तूत फेरचौकशीचे अनुषंगाने त्यांचे म्हणणे सादर केलेले नाही. तत्कालीन उपिवभागीय अधिकारी जत यांचेकडे केले अपील अर्जामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. जाबदार नं १ ते ४ यांनी तहसिलदार जत यांचेकडे ३०/१२/२०१६ रोजी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ च्या कलम ८५ प्रमाणे वर नमूद मिळकतीचे वाटप अर्ज दाखल करून दि. २७/०२/२०१७ रोजी क्र. हनों./ वाटप /एस आर / ५३/२०१७ चा आदेश दि. २७/०२/२०१७ रोजी मंजूर करून घेतलेले आहे. त्यामध्ये अन्य लोकांचा जो हिस्सा आहे त्यांना नोटीसा न काढता व बेकायदेशिर मंजूर केलेला आहे.

२. वाद मिळकत अपिलार्थी यांची मयत आत्या द्वारकाबाई हिचे असून तिने कोणतेही कागदपत्र न करता मयत झाली असलेने सर्व कायदेशिर वारसांना नोटीस काढून मग अर्ज दाखल करणे आवश्यक

होते. परंतु अपिलार्थी नं १ ते ४ यांनी बेकायदेशिर अयोग्य लाभ मिळविणेच्या कुटील हेतुने मे. तहसिलदारसो यांचेकडे अन्य वारसांची माहिती लपवून बेकायदेशिरपणे वाटप आदेश घेतलेला आहे.

३. द्वारकाबाई ही अपिलार्थी यांचे आजोबा म्हणजेच कोंडीबा यांची मुलगी असून मयत कोंडीबानी आपल्या मुलीचे लग्न झालेले नाही व तिच्या पोटापाण्या करीता वर नमूद केलेली दावा मिळकत वर्दी अर्जाने केले होते व ती मयत झालेली आहे. त्यामुळे त्या मिळकतीमध्ये मयत द्वारकाबाईचे कायदेशिर वारसांना नोटीसा न काढता कायदेशिर हक्क अधिकार असलेने त्यांना डावलून केलेले ८५ चे वाटप रदद होणेस पात्र आहे.

४. सदरचे ८५ प्रमाणे केलेले वाटप हे सर्व वारसांना सामील करून व द्वारकाबाईचे अन्य मिळकती ही या कामी सामील होणे आवश्यक होते त्यामुळे ८५ चे वाटप रदद होणेस पात्र आहे.

५. **जाबदार ०४ यांना त्यांचे लेखी युक्तिवादामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

६. अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारीसो जत यांचे निकालाचे विरूध्द सांगली येथील मे. अपर जिल्हाधिकारीसो यांचे कोर्टात आर टी एस दुसरे अपिल २२३/२०२१ चे अपिल दाखल केले होते. सदर अपिलार्थी यांचे अपिल अंशतः मान्य करणेत येत आहे व उपविभागीय अधिकारी जत यांनी क्र. आर टी एस अपिल २५/२०१९ मधील दिनांक ०९/०३/२०२१ रोजीचा आदेश रदद करणेत येत आहे असे म्हणून पुन्हा फेर चौकशी कामी या मे. कोर्टात पाठविणेत आले आहे.

७. अपिलार्थी यांनी पुन्हा जबदार यांना नोटीस काढले असून जाबदार नं ४ यांनी मे. अप्पर जिल्हाधिकारीसो सांगली यांचेकडे सुध्दा उपस्थित राहून म्हणणे सादर केलेले होते. उपविभागीय अधिकारीसो जत यांनी दि. ०९/०३/२०२१ रोजीच्या क्र आर टी एस अपिल २५/ २०१९ मध्ये कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता प्रस्तुतचा अर्ज विना कारवाई काढून टाकणेत आले होते. जाबदार यांना अपिलार्थी यांचे अपिल व विलंब माफी अर्जातील सर्व मजकुर मान्य व कबूल असून अपिलार्थी यांचे विलंब माफीचा अर्जही मंजुर करणेत यावा.

८. तहसिलदार जत यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८५ प्रमाणे वाटप करत असताना, संपूर्ण वारसांना नोटीसा काढून त्यांचे म्हणणे व जबाब घेणे आवश्यक होते तसेच मे. तलाठी यांचेकडून मयत द्वारकाबाई यांचे या वारसा व्यतिरीक्त अन्य कोणी वारस आहेत का याची चौकशी न करता एकतर्फा जाबदार यांचे सांगणेवरुन मूलतः बेकायदेशीर महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ च्या कलम ८५ प्रमाणे क्र.हनों/वाटप/एसआर /५३/२०१७ दिनाक २७/०२/२०१७ रोजी मंजूर करून घेतला आहे तो रद्द करण्यात यावा व जाबदार यांची कोणतीही हकरत नाही.

९. अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या अपिलास यापूर्वी जाबदार नं १ ते ३ व ५ ते ६ यांनी यापूर्वी मे. उपविभागीय अधिकारीसो जत यांचेकडे दाखल केलेल्या अपिलामध्ये तसेच मे. अप्पर जिल्हाधिकारीसो सांगली यांचेकडे दाखल केलेल्या अपिलात कधीही हजर होवुन म्हणणे दाखल केलेले नव्हते व नाही त्यामुळे या अपिलास कोणाचीही हरकत नसलेने अपिलार्थी यांचे विलंबमाफी सहीत अपिल मंजूर करणेत यावे.

**अपिलार्थी यांनी प्रकरणी दाखल केलेला अपील मेमो, जाबदार ०४ यांचा युक्तिवाद व प्रकरणी दाखल कागदपत्रे यांचे एकत्रित अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

**१.** मौजे लकडेवाडी ता.जत येथील गट नंबर २५/२ संदर्भात तहसिलदार, जत यांनी क्र.आरटीएस/एसआर/५३/२०१७, दिनांक २७.०२.२०१७, अन्वये दिले वाटप आदेशावर अपिलार्थी यांनी तत्कालीन उपविभागीय अधिकारी जत यांचेकडे क्र.आरटीएस/अपील/२५/२०१९ चे अपिल दाखल केलेले होते. सदर अपिलाचा निर्णय दिनांक ०९.०३.२०२१ रोजी झालेला असून सदर निर्णयावर व्यथित होऊन अपिलार्थी मा.अपर जिल्हाधिकारी सो, सांगली यांचेकडे क्र.आरटीएस/दुसरे अपिल/२२३/२०२१,दाखल केले होते. सदर अपिलाचा निर्णय दिनांक २२.०२.२०२४ रोजी झालेला असून तत्कालीन उपविभागीय

अधिकारी जत यांचेकडील उक्त आदेश रद्द करून प्रकरण निकालपत्रात नमूद कारणास्तव फेरचौकशी करून निर्णय करणेचे आदेशित केलेले आहे. त्यानुसार फेरचौकशीचे काम पुर्ण केले आहे.

२. वाद मिळकत ही व्दारकाबाई कोंडीबा कलगोंडे यांचेकडून गुलाब विठोबा कलगोंडे यांनी नोंदणीकृत खरेदी दस्ताने खरेदी घेतलेचे फेरफार क्र.६८७ दिनांक ३१.०३.२०११ चे अवलोक करता दिसून येत आहे. त्यामुळे वाद मिळकतीचे वाटप करून ठेवणार यांनी खरेदी घेतलेली मिळकत असलेने निश्चितच त्यामुळे सदर वाद मिळकत स्वकष्टार्जित आहे हा मुद्दा सुस्पष्ट होत आहे.

३. एकदा सदर वाद मिळकत स्वकष्टार्जित आहे हा मुद्दा सुस्पष्ट झालेले आहे. त्यामुळे कायदयाचे स्थिर तत्व (Settled Principle of law ) पाहता,

(A) मुळात वडिलांचे स्वकष्टार्जीत मिळकतीचे वाटप त्यांचे जीवनकालात होत नाही ही सर्वसाधारण बाब आहे.

(B) वडिलोपार्जीत मिळकत यामध्ये एकाचे मालकी हे तत्व नसते तर सहधारकांची मालकी हे तत्व असते. त्यासाठी कुटूंब एकत्र हिंदू कुटूंब असावे लागते, क्षेत्र वडिलोपार्जीत असावे लागते.

(C) स्वकष्टार्जीत मिळकतीत मुलांना कोणाताही अधिकार नसतो कारण त्यात सहधारक नसतात. याचे मुख्य कारण म्हणजे मालमत्ता वडिलोपार्जीत नाही स्वकष्टार्जीत आहे. त्यामुळे सहधारक म्हणून सर्वाची मालकी हे तत्व या ठिकाणी लागू पडत नाही.

(D) मा.उच्च न्यायालय दिल्ली यांनीही CS(OS)520/2018, IA No-14303/2018 दिनांक ०५.०९.२०१९ रोजी दिलेला निर्णय पाहता वडिलांचे ते जिवंत असेपर्यत स्वकष्टार्जीत मिळकतीचे वाटप करता येत नाही.

४. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८५ मधील तरतूदीनुसार वाटप हे सहहिस्सेदामध्ये होणे अपेक्षित असतांना तहसिलदार जत यांनी कले वाटप हे वर नमूद मुद्दा क्र.३ मधील बाबींचे उल्लंघन करणारे असलेने ते रद्द करणे आवश्यक आहे असे माझे मत झालेने मी,अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**निकालपत्रात नमूद कारणास्तव अपिल अर्ज मान्य करण्यात येवून तहसिलदार जत यांचा वाटप आदेश** क्र.आरटीएस/एसआर/५३/२०१७, दिनांक २७.०२.२०१७ **रद्द करण्यात येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर निकालाची समज सर्व संबंधिताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.in या वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

( अजयकुमार नष्टे )
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण -जत
दिनांक -०७.०३.२०२५

प्रत- तहसिलदार, जत यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.